Peer Reviewed International Research Journal of Geography
Maharashtra Bhugolshastra Sanshodhan Patrika
ISSN : 0971-6785 {Impact Factor 4.567 Renew (IIFS)} Vol. 38, No.1, Jan-Jun 2021. pp 108-111

# Population Growth In Chandrapur District

Dr. Godawari A. Gaurkar

***Abstract***

*The research presented in the summary attempts to find the population growth of Chandrapur district using the method of Gibbs. The study component of Chandrapur district has been selected. Its population growth has been negative from 1911 to 1921. However, in the following decades, the population has continued to grow, and the geographical conditions for population growth reflect the close relationship between urbanization, agriculture and industrial development, and demographic factors.*

**सारांशः**

प्रस्तुत शोधनिबंधात गिब्जयांच्या पध्दतीचा वापर करून चंद्रपूर जिल्ह्यातील लोकसंख्या वृध्दी शोधण्याचा प्रयत्न केला आहे. चंद्रपूर जिल्हा हा अभ्यास घटक निवडला आहे. या अभ्यासासाठी १९०१ ते २०११ हा कालावधी निवडला आहे. सदर ची लोकसंख्या वृध्दी १९११ ते १९२१ या दशकात नकारात्मक वाढ झालेली आहे. मात्र त्या पुढील दशकामध्ये लोकसंख्या सतत वाढत गेलेली आहे. तसेच लोकसंख्या वृध्दी करीता भौगोलिक परिस्थिती, नागरीकरण, शेती व औद्यागिक विकास आणि लोकसंख्या शास्त्रीय घटकांचा निकटचा संबंध दर्शवितात.

**प्रास्ताविक :**

लोकसंख्या वृध्दी ही एक लोकसंख्याशास्त्रीय प्रक्रिया आहे. या प्रक्रियेत सर्व लोकसंख्याशास्त्रीय घटक प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे समाविष्ट झालेले असतात. आधुनिक काळात औद्योगीकरणामुळे नागरीकरण मोठ्या प्रमाणात होत आहे. ज्या प्रदेशामध्ये औद्योगीकीकरण वेगाने होत असल्याने स्थलांतरामुळे मोठ्या प्रमाणात लोकसंख्या वाढ होतांना दिसून येते. त्यामुळे त्या प्रदेशात लोकसंख्या वाढीमुळे वेगवेगळ्या समस्या निर्माण होतात. या वृध्दीमध्ये स्थलांतर हा घटक प्रभावी असल्याचे दिसून येते. या दृष्टीकोनातून प्रस्तुत शोधनिबंधामध्ये चंद्रपूर जिल्ह्यातील लोकसंख्या वृध्दी गिब्ज यांच्या पध्दतीनुसार जाणून घेण्याचा प्रयत्न केला आहे.

**अभ्यास क्षेत्र :**

चंद्रपूर जिल्हा हा क्षेत्रफळाने महाराष्ट्र राज्यातील सर्वात मोठा तर देशातील दुसऱ्या क्रमांकाचा जिल्हा समजला जाता होता. २६ ऑगस्ट १९८२ रोजी या महाकाय जिल्ह्याचे विभाजन करण्यात येऊन चंद्रपूर व गडचिरोली हे दोन स्वतंत्र जिल्हे निर्माण केले गेले. तसेच चंद्रपूर जिल्हा ऐतिहासीक दृष्ट्या आणि निसर्गाने मुक्त हस्ताने नैसर्गिक आणि खनिज संपत्तीचे वरदान दिले आहे.

चंद्रपूर जिल्ह्याचा विस्तार $18^{0}27'$ उत्तरते $20^{0}43'$ उत्तर अक्षवृत्त आणि $78^{0}48'$ ते $79^{0}59'$ पूर्व रेखावत एवढा आहे. जिल्ह्याचे एकूण भौगोलिक क्षेत्रफळ 11443 चौ. कि.मी. आहे. महाराष्ट्राच्या पूर्वेकडे चंद्रपूर जिल्हा स्थित असून उत्तरेस भंडारा व नागपूर जिल्हा पूर्वेस गडचिरोली जिल्हा, दक्षिणेस आंध्रप्रदेशातील अदिलाबाद जिल्हा, पश्चिमेस यवतमाळ जिल्हा व वायव्येस वर्धा जिल्हा असे स्थान या जिल्ह्यास लाभले आहे. तसेच समुद्र सपाटी पासून उंची १८९ मी. एवढी आहे.

चंद्रपूर जिल्ह्यामध्ये एकूण पंधरा तालुक्याचा समावेश असून त्यामध्ये चंद्रपूर, भद्रावती, वरोरा, चिमूर, नागभीड, ब्रम्हपूरी, गोंडपिपरी, राजूरा, मूल, सिंदेवाही, कोरपना, सावली, पोंगुर्णा, बल्लारशा, जिवती आहे. भारत सरकार ने महाराष्ट्राच्या अतिपूर्वेस वसलेल्या या आदिवासी जिल्ह्याच्या विकासार्थ अनेक योजना सुरू केल्या. चंद्रपूर जिल्ह्यात नैसर्गिक साधन संपत्ती विपुल प्रमाणात उपलब्ध असल्याने या संसाधनाच्या आधारावर, नवनविन उद्योगधंदे स्थापन केले. वाढत्या, शैक्षणिक सोयी, प्रशासकीय केंद्र, औद्योगिक व व्यापारी केंद्र इत्यादीमुळे चंद्रपूर जिल्ह्यात व्यापक प्रमाणात बदल झाले.

वर्ष २०११ नुसार चंद्रपूर जिल्ह्याची एकूण लोकसंख्या २२०४३०७ असून या जिल्ह्याचा घनता १९० चौ.की.मी. आहे. तसेच या जिल्ह्यांची लिंगगुणोत्तर ९६१ एवढे आहे. वर्ष २०११ च्या जनगणने नुसार चंद्रपूर जिल्ह्यातील लोकांख्या महाराष्ट्राच्या एकूण लोकसंख्येच्या १.९६% इतकी आहे.

वर्ष १९७१ ते १९९१ या काजावधीत लोकसंख्या तीव्र वेगाने वाढलेली दिसून येते. ही वाढ तीव्र व स्फोटक असल्याचे जाणवते. तसेच वर्ष २००१ ते २०११ मध्ये लोकसंख्या वृध्दी दर कमी झाला आहे. अल्पावधीत झालेल्या लोकसंख्या वृध्दीमध्ये काही बाबतीत सकारात्मक तर काही बाबतीत नकारात्मक परिणाम झालेला जाणवतो.

**उद्देश :**

चंद्रपूर जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात होणारे औद्योगिकीकरण त्यामुळे लोकसंख्येत होणाऱ्या वृध्दीचा अभ्यास करण्याचा प्रयन्त केला आहे.

**सांख्यिकीय माहीती व संशोधन पध्दती :**

सदरचा अभ्यास पूर्वप्रकाशित आकडेवारीवर आधारलेला असून ही सांख्यिकी माहीती २०११ चा जनगणना अहवाल पुस्तकातून संकलीत केलेली आहे. जिल्हा हा अभ्यास घटक मानला असून अभ्यासासाठी १९०१ ते २०११ या कालावधीची निवड केली आहे. दशकाची शेकडा वार्षिक वृध्दीदर काढण्यासाठी खालील सुत्राचा अवलंब केला आहे.

$$\text{लोकसंख्या वृध्दी दर} = \frac{\text{चालू जनगणना वर्षाची लोकसंख्या} - \text{आधार वर्षातील लोकसंख्या}}{\text{आधार वर्षातील लोकसंख्या}} \times 100$$

तसेच गिब्ज यांच्या पध्दतीनुसार लोकसंख्या वृध्दीचा दर खालील सुत्रानुसार काढलेला आहे.

$$X = \frac{(P_2 - P_1)^{/t}}{(P_2 - P_1)^{/2}} X\ 100$$

**खुलासा :**

X= वार्षिक लोकसंख्या वृध्दीदर — $P_1$= पहिल्या वेळेची लोकसंख्या

$P_2$= दुसऱ्या वेळेची लोकसंख्या — t= विशिष्ट कालावधीतील वर्ष

**विषय विवेचन**


लोकसंख्या वृध्दीमध्ये झालेला बदल जनगणनेनुसार दर महा वर्षानी समजू शकतो. परंतु लोकसंख्या वृध्दीचा दर मात्र ठरवितांना वार्षिक कालावधी विचारात घेता लोकसंख्येची काळानुरूप होणरी वाढ देखील सर्वत्र सारखी नाही. चंद्रपूर जिल्ह्यातील लोकसंख्या वृध्दी दर तक्ता व आलेखामध्ये दाखविले आहे.

**सारणी- चंद्रपूरजिल्हा : लोकसंख्यावृध्दीदर १९०१-२०११**

| वर्ष | लोकसंख्या | शेकडा वृध्दी | गिब्ज यांचया सुत्रानुसार वृध्दीचा दर |
|---|---|---|---|
| 1901 | 397079 | - | – |
| 1911 | 504261 | +26.99 | +2.42% |
| 1921 | 494594 | -1.92 | +0.19% |
| 1931 | 569233 | +15.09 | +1.42% |
| 1941 | 651323 | +14.42 | +1.36% |
| 1951 | 728013 | +11.77 | +1.12% |
| 1961 | 851678 | +16.99 | +1.58% |
| 1971 | 1117908 | +13.26 | +2.76% |
| 1981 | 1416953 | +26.75 | +2.40% |
| 1991 | 1771994 | +25.06 | +2.26% |
| 2001 | 2071101 | +16.87 | +1.57% |
| 2011 | 2204307 | +6.43 | +0.63% |

स्त्रोत : चंद्रपूर जिल्हा जनगणना अहवाल १९०१-२०११

**आलेख - चंद्रपूर जिल्हाः लोकसंख्या वृध्दी दर १९०१-२०११**



वरील सारणीत १९०१ ते २०११ पर्यंत लोकसंख्या कशी वाढत गेली. हे दशकानुसार गिब्ज पध्दतीनुसार दाखविण्यात आले आहे. १९११ ते १९२१ शा दशकात लोकसंख्या १.९२ टक्क्येयांनी घट झाली आहे. १९६१ ते १९७१ या दशकात सर्वाधिक लोकसंख्येत २.७६ टक्केवाढ झाली आहे. तसेच २०११ मध्ये मात्र लोकसंख्येची शेकडा वाढ बऱ्याच अंशी ६.४३ टक्के कमी झालेली आहे. २०११ मध्ये लोकसंख्या वृध्दी दर कमी झालेला दिसून येतो. परंतु १९२१ नंतर लोकसंख्येत वाढ होतांना दिसून येते. १९७१ साली या शतकातील लोकसंख्या वृध्दीदराचा उच्चांक गाठला आहे. कारण त्यानंतर लोकसंख्या इतक्या तीव्र वेगाने कोणत्याच दशकात वाढली नाही. तीव्र गतीने झालेले औद्योगिकरण त्यामुळे मोठ्या प्रमाणात झालेले स्थलांतर, सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक व आरोग्य विषयक क्षेत्रात तीव्र गतीने झालेली वाढ लोकसंख्येचा वृध्दी दर उच्चतम ठेवण्यास कारणीभूत आहे. तसेच २०११ मध्ये लोकसंख्येतील शेकडा वाढ आणि वृध्दीदर कमी झालेला आहे. कारण या दरम्यान मोठे उद्योग सुरू झालेले नाही. तसेच चंद्रपूर जिल्ह्यात वर्धा नदीच्या खोऱ्यातील कोळसा खाण उद्योगातील परमीट धारकांची झपाट्याने पिछेहाट झाली. नागपूर वणी हा बायपास मार्ग सुरू झाल्यामुळे चंद्रपूर मार्ग चंद्रपूर, बल्लारशा, राजुरा, माणिकगड, गडचांदूर, कोरपना व आंध्रप्रदेशाकडे होणारी वाहतूक जिवती मार्गाने होऊ लागली. त्यामुळे परिवहन व व्यापाराच्या दृष्टीने चंद्रपूर जिल्ह्यातील महत्वाच्या शहरामध्ये होणारे स्थालांतर कमी झाले आणि परिणामतः २०११ या दशकातील शेकडा वाढ आणि वृध्दीदर हा कमी झालेला आहे.

गिब्ज यांच्या सुत्रानुसार लोकसंख्या वाढीची वृध्दी व दर लक्षात घेता १९३१, १९४१, १९५१ साली लोकसंख्येची जलद वाढ दर्शविते. १९६१ ते १९९१ या दशकात लोकसंख्येची जिल्ह्याची लोकसंख्या पृध्दी स्फोटक स्वरूपाची आहे. वर्ष २०११ पर्यंत लोकसंख्या वाढीचा दर कमी झालेला आहे. अशाप्रकारे गिब्ज यांनी सांगितल्याप्रमाणे चंद्रपूर जिल्ह्यातील लोकसंख्या वृध्दी लक्षात येते.

**निष्कर्ष :**

चंद्रपूर जिल्ह्यातील लोकसंख्या वृध्दी परीणामी लोकसंख्या वृध्दीचा अधिक भार नैसर्गिक साधन संपदावर उत्तरोत्तर वाढत आहे. तसेच उद्योगधंद्यातील रोजगाराच्या निमित्ताने पर प्रांतामधुन मोठ्या प्रमाणात स्थलांतर झाले. सोबतच विविध उद्योगाची निर्मिती  व्यापार पेठेचा विस्तार व शैक्षणिक सोयरची उपलब्धता इत्यादींमुळे लोकसंख्येत फार मोठ्या प्रमाणात वाढ झालेली आहे.

**संदर्भः**

१. डॉ. कुलकर्णी एस.एन.डॉ. श्रीवास्तव सतीश (१९९८) लोकसंख्या शास्त्र आणि लोकसंख्या शिक्षण, पेज क्र. १५१

२. दीक्षीत अनुपमा (२००३) जौन पुरजन पद (उ.प्र.) मेज न संख्या वृध्दी प्रारूप, उत्तर भारत भूगोल पत्रिका Vol 39 June – Dec 2003

३. चान्दना आर. सी. (२००१) जनसंख्या भूगोल पेज क्र. १५९–१६७

4) Dubey R.M. (1981) “population Dynamic of India,” Xlush Publication Allahabad.

5) Ghosh B.N. (1987) “Fundamental of Population Geography” sterling publication New Delhi.

6) Chatterjee, S.P. (1961), “Physical futures and Population Distribution in West Bengal” Calcutta Geographical Review Pp.23

*** Dr. Godawari A. Gaurkar**
Assistant Professor, Department Of Geography
S. Chandra. Mahila Mahavidyalaya,Sakoli, District Bhandara